**L. A. BILL No. IV OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४.**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ मार्च २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ९ मार्च २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९४९ चा ५९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा,
१९६५ चा महा. ४०. नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

एचबी १९८१-१

प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याची सुधारणा

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ४५२अ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्या कलम ४५२अ मध्ये, पोट-कलम (१अ) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९४९ चा ५९.

"(१ब) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा राज्य निवडणूक आयोगाने राज्य शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले असेल की, राज्यामध्ये कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे पोट-कलम (१अ) अन्वये काढलेल्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे राज्य निवडणूक आयोगास शक्य होणार नाही तेव्हा, राज्य शासनास, आदेशाद्वारे, या अधिनियमान्वये महानगरपालिकेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, राज्य निवडणूक आयोगाद्वारे विनंती करण्यात येईल, अशा कालावधीसाठी शासकीय अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल, किंवा पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा कालावधी वाढविता येईल.".

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा

१९६५ चा महा. ४०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३१७ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, याच्या कलम ३१७ मधील पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(३) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा राज्य निवडणूक आयोगाने राज्य शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले असेल की, राज्यामध्ये कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत नगरपरिषदांच्या किंवा नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे राज्य निवडणूक आयोगास शक्य होणार नाही, तेव्हा, राज्य शासनास, आदेशाद्वारे, या अधिनियमान्वये नगरपरिषदेच्या किंवा नगरपंचायतीच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाद्वारे विनंती करण्यात येईल, अशा कालावधीसाठी शासकीय अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल, किंवा पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा कालावधी वाढविता येईल.".

(शा.म.मु.) एचबी १९८१-२ (५५०-३-२०२१)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४.]**

**[महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ५ मार्च २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ९ मार्च २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई